रविवार, दि. २५ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २८९ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### संभाजी भिडे आणि सदावर्तेचा बोलवता धनी तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मराठा, धनगर, बहुजन वाद वाढावा ही देवेंद्र फडणवीस प्रणीत चाल; समस्त बहुजन समाजाने सावध राहावे - डॉ. संजय लाखे

**जालना । प्रतिनिधी -** संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी आणि गुणरत्न सदावर्ते यांचा बोलवता, कर्ता, करविता धनी तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच असून साक्षात मुघल सम्राट औरंगजेबाला शक्य झाले नाही ते घडवण्याचा हा बालिश प्रयत्न केला जात असल्याचा गंभीर आरोप करत मराठा, धनगर, बहुजन वाद वाढावा ही देवेंद्र फडणवीस प्रणीत चाल असून समस्त बहुजन समाजाने सावध राहावे असे आवाहन शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सचिव डॉ. संजय लाखेपाटील यांनी केले आहे.

या संदर्भात बोलतांना डॉ. संजय लाखे पाटील म्हणाले की, या युगी सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ पातशाह... मऱ्हाटा पातशाह एवढा छत्रपती जाहला, ही गोष्ट सामान्य झाली नाही.. असे ज्याचे तत्कालीन सर्वदेशी इतिहासकारांनी वर्णन केले आणि ज्या घटनेने मृतप्राय तमाम हिंदू समाजात अक्षरशः नवचैतन्य संचारले अशी शेकडो वर्षातून घडलेलूली शिवराज्याभिषेक ही एकमेवाद्वितीय ऐतिहासिक जिवंत घटना असून ०६ जून हा नेमानेच साजरा होणारा भारतवर्षातील एक सर्वोच्च आनंद सोहळा असून त्या पासून करोडो लोक, पिढ्यान्-पिढ्या लढावू वृत्ती, अचूक नियोजन, स्वातंत्र्य, स्वराज्य, रयतेचे राज्य आणि स्वाभिमान यांची प्रेरणा घेतात आणि हा सोहळा तिथी, तारीख अश्या वादात न पडता दररोज ही साजरा करण्यास व हृदयाच्या देव्हाऱ्यात पुजण्यासाठी सज्ज असतात. तोच राज्यभिषेक सोहळा सहेतुक तिथी आणि तारखेच्या वादात ओढून आपल्या हुकूमी आणि पाळीव गुलाम अनुयायांना हाताशी धरून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कुहेतुपुर्वक राज्यात मराठा धनगर बहुजन हा जातिय - धार्मिक वाद तेवत ठेवण्यासाठी प्रयत्नशिल आहेत आणि म्हणूनच युगप्रवर्तक युगपुरूष शिवशककर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक शिवराज्याभिषेकचा तारीख आणि तिथी असा वाद उकरून काढण्याचे षडयंत्र संभाजी भिडे मार्फत आखून आणि त्यात पुन्हा अनैतिहासिक वाघ्या कुत्र्याचा तडका द्यायला लावून जातिय धार्मिक वाद निर्माण करून विशेषतः महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडवण्याचे षडयंत्र रचत असल्याचा अतिशय गंभीर आरोप शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सचिव डॉ. संजय लाखेपाटील यांनी केला आहे.

मुघल बादशहा औरंगझेबाचा सरदार मिर्झा राजे जयसिंग यांचा विजय व्हावा म्हणून होमहवन यज्ञ करणाऱ्यांच्या जातकुळीचा वारस शिवद्रोही संभाजी भिडेचे, शिवराज्याभिषेक सोहळा कायमचा नामशेष करा हे गुन्हेगारी स्वरूपाचे वक्तव्य पाहून गृहमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांना यात





काहीच दखलपात्र वाटत नाही का? साक्षात छत्रपती शिवाजी महाराज आणि पवित्र आणि पिढ्यानपिढ्या प्रेरणादायी शिवराज्याभिषेक सोहळा कायमचा नामशेष करा असे म्हणून संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी याने अतिशय गंभीर गुन्हा केला गेला आहे असे फडणवीस यांना गृहमंत्री म्हणून वाटत नाही का? शिवराज्याभिषेक कायमचा नामशेष करा या भिडे यांच्या नालायकी वक्तव्यामुळे शिवभक्त म्हणून श्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वतःच्या भावनेला ठेच पोहोचली नाही का? मग स्वतः फडणवीस आणि त्यांचे गृहखाते इतकं बेसुध का आहे? की या गुन्हेगारी कृत्याची स्वतः होऊन दखलच घेत नाही? भिडे विरोधात कुणीतरी तक्रार करावी आणि आपण भिडे च्या डोक्यावर हात ठेवून अश्या विकृत प्रवृत्तीचे समर्थक गोंजारावेत यांची फडणवीस वाट पाहात आहेत का? असा रोकडा सवाल डॉ. संजय लाखेपाटील यांनी विचारला आहे. गेल्या काही दिवसांपूव पिसाळलेले कुत्रे चावल्यानंतर पहिल्यांदाच सार्वजनिक ठिकाणी प्रगट होऊन संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी याने काल पिसाळलेल्या कुत्र्यागतच ठरवून दिलेली वक्तव्य भुंकली आहेत आणि संपूर्ण महाराष्ट्र आणि देशातील तमाम सर्वधमय शिवप्रेमी दरवष प्रमाणे ६ जूनच्या शिवछत्रपती राज्याभिषेक सोहळ्याची तयारीत मग्न असतांनाच

(आणि काही तिथी प्रमाणे आजही साजरा करतातच) त्याने पिसाळल्यागत वक्तव्ये करून सुसंस्कृत शिवप्रेमींच्या मनाचे आणि भावनेचे लचके तोडण्याचा आणि त्यांना भडकावण्याचा अश्लाघ्य प्रयत्न केला आहे आणि ६ जूनचा शिवछत्रपती राज्याभिषेक कायमचा नष्ट झाला पाहिजे; कायमस्वरूपी बंद केला पाहिजे.! अशी अतिशय भडकावू वक्तव्ये केली आहेत आणि आज पुढील क्रम ठरवून दिल्यागत गुणरत्न सदावर्ते आदी त्यात सामिल झालेले दिसून येत आहेत! संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी यांच्या काल आणि मागच्या काही दिवसांतील भेटी गाठी बघता आणि या संपूर्ण घटनाक्रमाची क्रोनोलॉजी समजून घेता भिडे व सदावर्ते आदी जे पिसाळलेले धाडस करताहेत त्यामागे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची फुस आहे. हे लक्षात येते! आणि म्हणूनच गृहमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस किंवा त्यांचे हुकमी गृहखाते गप्पगार आहे. यामागे एकीकडे शिवछत्रपती राज्याभिषेक सोहळ्याला तिथी, तारखेचा वाद निर्माण करायचा तर दुसरीकडे त्यास अनैतिहासिक वाघ्या कुत्र्याचा तडका देऊन स्वतः जातिवंत इतिहासकार असल्यागत तो काढूच नका असे असंदभय म्हणत येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त होणाऱ्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर धनगर मराठा बहुजन हा सामाजिक वाद वाढवायचा अशी ही कुटील चाल असून त्या पाठीमागे अनाजीपंत फडणवीस यांच्या शिवाय दुसरा कुठलाही विचित्र मेंदू असूच शकत नाही कारण हे दोघेही फडणवीस यांची पाळीव असंस्कृत जनावरे आहेत हे उभ्या महाराष्ट्राला अतिशय चांगले अवगत आहे. आणि येत्या काही दिवसांत संभाजी भिडे आदींच्या वक्तव्याने राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था परिस्थिती बिघडली तर त्याची जबाबदारी ही निश्चितच फडणवीस आणि गृहखात्याची असेल हे नक्की. कदाचित पान २ वर

युवा आदर्श

### व्हर्चूअल ...

चांगला नवा प्रकार
व्हर्चूअल उद्घाटन
परिपूर्ण रे समारोह
दाबायचे एक बटन
वेळ वाचतो सर्वांचा
सारे जुळते झट्कन
आपले कामा लागा
मोकळे होई पटकन्
नकोत नेत्यांचे नखरे
कमी होईलं दडपण
दावणीला अधिकारी
उगाचं लावी आपण
हुश्श होतीलं यंत्रणा
ते प्रोटोकॉल टेन्शन
अन्य कार्या उपयोगी
पोलिसांचे अटेन्शन
एकाच वेळी कित्येक
प्रकल्पांचे लोकार्पण
सुट सुटीत कार्यक्रम
शुध्द भावने संतर्पण
नवीन तंत्रज्ञान वापरा
संकल्प मार्गी भर्रकन्
प्रसिद्धी मिळे अधिक
आलेख सुधार झर्कन

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## महावितरणच्या गलथान कारभारामुळे संपूर्ण शहरवासीय त्रस्त

### महावितरणच्या उच्च अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन नागरीकांच्या समस्या सोडवाव्या - दिपक शेळके

**जालना । प्रतिनिधी -** महावितरणचा शहरातील कारभार भोंगळ झाला आहे. लाईट कधी येते कधी जाते. वीज येण्या जाण्याला काळ वेळ राहिलेला नाही अनेक भागात विजेच्या तारा लोंबकाळलेल्या आहेत.जास्त दाब आहे तिथे कमी दाबाची रोहित्र बसवलेली आहे.महावितरणचा शहरात भोंगळ कारभार सुरू आहे.अशी टीका शहरातील नागरिक करत आहे.



मान्सून पूर्व कामे वेळेवर न केल्यामुळे आणि मे महिन्यामध्येच पावसाळा सुरू झाल्यामुळे महावितरणच्या गलथान कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. संपूर्ण जालना शहराला महावितरणने वेठीस धरले असून शहरातील प्रत्येक प्रभागांमध्ये नागरिकांच्या महावितरण विरोधात तक्रारी आहेत. वादळी वाऱ्यामुळे विद्युत खांब झुकल्यामुळे किंवा जमीन दोस्त झाल्यामुळे विद्युत तारा लोंबकळलेल्या आहेत तर काही ठिकाणी पाच पाच सहा सहा तास विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे नागरिक हैराण आहेत तर टटूपुरा, दुःखी नगर भागामध्ये उच्च दाबाने विद्युत पुरवठा झाल्याने नागरिकांच्या घरातील विद्युत उपकरणे अक्षरशः जळाली आहेत. काही ठिकाणी दोन दोन दिवस विद्युत पुरवठा खंडित आहे. अशा अनेक तक्रारी संपूर्ण शहरांमध्ये महावितरणच्या विरोधात आहेत. अशातच महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी फोन सुद्धा घेत नसल्याचच्याही अनेक तक्रारी शहरवासीयांच्या आहेत याकडे उच्च पातळीवरील अधिकाऱ्यांनी जातीने लक्ष देऊन नागरिकांना त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी आणि कर्मचाऱ्यांना तशा सूचना द्याव्यात अशी मागणी समाजवादी पार्टीचे शहर अध्यक्ष दीपक शेळके यांनी दिनांक २४ शनिवार रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास रेल्वे स्टेशन रोड वर माध्यमांशी बोलताना केली आहे.

शहरातील नळगल्ली भागात गेल्या आठवड्यात वीजेची तार पडून एका गायीचा मृत्यू झाला होता. याची नोंद कोठेही झाली नाही. त्याच नळगल्ली भागात एका बांधकामाच्या ठिकाणी बांधकामाचे बांबू बाहेर आल्यामुळे ते वीजेच्या तारांना स्पर्श होत होते. या बांबूमुळे वीजेची तार तुटली. सुदैवाने तार सकाळी तुटल्यामुळे काही हानी झाली नाही. हा रहदारीचा रस्ता आहे. इतर वेळेत ही तार तुटली असती तर मनुष्य हानी होण्याचा मोठा धोका या ठिकाणी होता. असे असतांना याकडे महावितरणसह मनपाचेही लक्ष नसल्याचेही दीपक शेळके यांनी म्हटले आहे.

मॉन्सूनपूर्व कामं झालेली दिसत नाहीत.मात्र तरीही महावितरणकडून कामे करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. ज्या ठिकाणी कामे झालेली नसताना झाल्याचं दाखवलं त्या ठिकाणच्या कामांची चौकशी करायला हवी अशी मागणी दीपक शेळके यांनी केली आहे. महावितरणचं अलीकडच्या पाऊस झालेल्या १० दिवसात पितळ उघडे झाले असून गलथान कारभार चव्हाटयावर आला आहे.

### जालना शहरात हिरकणी महोत्सवाचे आयोजन

## महिलांसाठी होम मिनिस्टर कार्यक्रमासह विविध भरगच्च कार्यक्रमाची मेजवानी



**जालना । प्रतिनिधी -** येथील उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दि. २६ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, टाऊन हॉल, जुना जालना येथे महिलांसाठी हिरकणी महोत्सव आयोजित करण्यात आला असून या महोत्सवात महिलांच्या आवडीचा होम मिनिस्टर कार्यक्रम होणार आहे. तसेच महिलांसाठी विविध योजना आणि माहितीचे स्टॉल देखील या ठिकाणी राहणार आहेत. त्यामुळे या कार्यक्रमाला सर्व महिलांनी उपस्थित रहावे असे संस्थेच्या अध्यक्षा सौ. करुणा अच्युत मोरे यांनी केले आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते करण्यात येणार असून कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जालना समाजकार्य महाविद्यालयाचे प्रचार्य डॉ. राजकुमार म्हस्के यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुने म्हणून पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, जिल्हा परिषदेचे पान २ वर



शहरातील नळगल्ली भागात बांधकामाच्या बांबूमुळे वीजेचे तार तुटल्याची घटना घडली. पहाटे घडलेल्या या घटनेमुळे कोणतीही हानी झाली नाही. गेल्या आठवड्यात याच भागात वीजेचे तार पडल्यामुळे एका गायीचा मृत्यू झाला होता. आता दुसऱ्यांदा पुन्हा तार तुटल्याची घटना घडल्याने महावितरणच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

# संपादकीय

## गोल्डन बॉयचे स्वप्न साकार

९० मीटर भाला फेकण्याचे भारताचा गोल्डन बॉय ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्राचे स्वप्न साकार झाले आहे. नीरज चोप्राने दोहा डायमंड लीगमध्ये ही अभिमानास्पद कामगिरी केली आहे. दोहा डायमंड लीगमध्ये तिसऱ्या प्रयत्नात ९०.२३ मीटर भाला फेकत नीरजने स्वप्न साकार केले आहे. ९० मीटर भाला फेकून त्याने स्वतःचाच राष्ट्रीय विक्रमही मोडला आहे. त्याची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच आहे कारण ९० मीटर भाला फेकणारा तो भारताचा पहिलाच भालाफेक पटू ठरला असून अशी कामगिरी करणारा तो जगातील केवळ दुसरा भालाफेकपटू आहे. ९० मीटर भालाफेकणे हे कोणत्याही भालाफेकपटूचे स्वप्न असते तसे ते निरजचेही होते. आपल्या कारकीर्दीत ९० मीटर फेकण्याचे स्वप्न नीरज ने पाहिले आणि त्याने ते साकार केले आणि ते सत्यात उतरवले याबद्दल नीरजचे मनापासून अभिनंदन! याआधी त्याने अनेकदा प्रयत्न केला पण त्याला ९० मीटर भाला फेकत आला नव्हता मागील वर्षीच त्याने लॉसने डायमंड लीगमध्ये पहिलं स्थान पटकावलं होतं. त्यात त्याने ८७.६६ मीटर अंतरावर भालाफेकला होता. त्याचा या ऐतिहासिक कामगिरीने देशातील १४४ कोटी जनतेची मान उंचावली आहे अर्थात अशी ऐतिहासिक कामगिरी करण्याची त्याची ही पहिली वेळ नाही याआधी तीन वर्षांपूर्वी नीरज चोप्राने टोकियो ऑलिंपिकमध्ये विक्रमी भालाफेक करून सुवर्णपदक जिंकून इतिहास घडवला होता. विशेष म्हणजे ऍथलॅटीक्समध्ये भारताला मिळालेले हे पहिलेच पदक होते. याआधी मिल्खा सिंग, पी टी उषा हे पदकाच्या जवळ पोहचूनही पदकाला गवसणी घालू शकले नव्हते ती किमया नीरजने करून दाखवली होती. भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक आणि दोनदा डायमंड लीग स्पर्धा जिंकणाऱ्या नीरज चोप्राचा जन्म २७ डिसेंबर १९९७ ला हरियाणातील पानिपत जिल्ह्यातील खांद्रा या छोट्याशा गावात एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्याचे शिक्षण चंदीगड येथे झाले. लहानपणापासून त्याला खेळाची आवड होती. त्याचे वजन ८० किलो होते त्यामुळे गावातील लोक त्याला सरपंच म्हणत. कुस्ती, कबड्डी असे खेळ त्या गावातील मुले खेळत पण नीरजने मात्र भालाफेक या खेळाची निवड केली. विशेष म्हणजे त्याच्या गावात कोणीही भालाफेक हा खेळ खेळत नव्हते. भाला फेक हा खेळ जागतिक स्तरावर खेळला जातो हे देखील त्या गावातील काही लोकांना माहीत नव्हते त्यामुळे अनेकांनी त्याला भालाफेक सोडून कुस्ती हा खेळ खेळण्यास सांगितले. नीरजने मात्र त्याकडे दुर्लक्ष करून भालाफेकीतच करियर करायचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करायचे असा निश्चय केला. त्यासाठी त्याने तंदुरुस्तीवर भर दिला. खूप प्रयत्न करून स्वतःचे वजन कमी केले. भालाफेकीचा दररोज सराव केला. खेळात सातत्य ठेवले आणि दिवसेंदिवस चांगली कामगिरी केली. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत चांगली कामगीरी केल्याने २०१६ साली दिल्लीत झालेल्या आशिआई स्पर्धेत भारतीय पथकात त्याची निवड झाली. आपल्या या पहिल्याच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत त्याने भारताला सुवर्णपदक मिळवून दिले. त्यानंतर २०१६ मध्येच पोलंडमध्ये झालेल्या २० वर्षाखालील वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये ८४. ४८ मीटर दूर भाला फेकून सुवर्णपदक मिळवले. अंजु बॉबी जॉर्ज नंतर आंतरराष्ट्रीय स्पर्धेत एथलॅटीक्समध्ये भारताला पदक मिळवून देणारा नीरज हा दुसराच भारतीय खेळाडू ठरला होता. एकाच वर्षात दोन महत्वाच्या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकल्याने त्याचे जगभर नाव झाले. या कामगिरीनंतर नीरजची भारतीय सेनेत ज्युनियर कंडिशन ऑफिसर म्हणून नेमणूक करण्यात आली. २०१८ साली जकार्ता येथे झालेल्या एशियन गेम्समध्ये त्याने ८८.०७ मीटर भाला फेकून राष्ट्रीय विक्रमासह सुवर्णपदक जिंकले. सतत चांगली कामगिरी करणाऱ्या नीरजला २०१९ मध्ये मात्र दुखापतीने घेरले. त्याच्या खांद्यावर शस्त्रक्रिया करावी लागली त्यामुळे त्याला काही महिने खेळापासून दूर राहावे लागले. २०२० साली जगभर कोरोनाचा प्रादुर्भाव वाढला त्यामुळे त्याला सक्तीची विश्रांती घ्यावी लागली. त्यामुळे त्याच्या ऑलिम्पिक तयारीवरही मोठा परिणाम झाला असे असतानाही या ऑलिम्पिकमध्ये भारताला पदक मिळवून द्यायचेच या निश्चयाने तो मैदानात उतरला. पहिल्या प्रयत्नातच त्याने ८७.०३ मीटरवर भाला फेकून आघाडी मिळवली. दुसऱ्या प्रयत्नात नीरजने ८७.५८ मीटर भाला फेकत पहिल्या प्रयत्नाच्या तुलनेत सुधारणा केली तिसऱ्या प्रयत्नात नीरजचा भाला ७६.७९ मीटरवर गेला. त्याचा चौथा आणि पाचवा प्रयत्न मात्र अवैध ठरला. मात्र बाकी स्पर्धकांची कामगिरी सर्वसाधारण राहिली त्यामुळे नीरजची आघाडी कायम राहिली. सहाव्या प्रयत्नात नीरजने ८४.२४ मीटर अंतरावर भाला फेकून सुवर्णपदकाला गवसणी घातली. त्याचे सुवर्णपदक निश्चित झाले की देशवासीयांनी दिवाळीच साजरी केली होती आजही तोच उत्साह देशवासीयांमध्ये आहे. ९० मीटर भाला फेकणारा भारतातील पहिला व जगातील दुसरा भालाफेकपटू ठरलेल्या निरजच्या यशाने देशातील १४४ कोटी देशवासियांची छाती अभिमानाने फुगली आहे. ९० मीटर भाला फेकण्याचे स्वप्न साकार करणाऱ्या नीरज चोप्राचे मनापासून अभिनंदन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात विश्वविद्यालयाच्या साधिकांकडून भक्तिरसपूर्ण गायन व नृत्यवंदना !

## भारतासह २३ देशांतील ३० हजारांहून अधिक भाविकांनी या महोत्सवाला उपस्थिती






**फोंडा, गोवा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवलेनगरी)** - सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सवानिमित्ताने आयोजित ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’त महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाच्या साधिकांनी सादर केलेली नृत्यवंदना आणि गायन ही कलाकृती भक्तिरसाने भारलेली आणि ईश्वरप्राप्तीच्या ध्यासातून साकारलेली होती. ‘कलेचा उपयोग केवळ मनोरंजनापुरता न करता ती साधनास्वरूप असू शकते’ हे या सादरीकरणांनी प्रत्यक्ष दाखवून दिले. फर्मागुडी, फोंडा येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर हा महोत्सव मोठ्या भक्तिभावाने पार पडला. भारतासह २३ देशांतील ३० हजारांहून अधिक भाविकांनी या महोत्सवाला उपस्थिती लावली होती.

नृत्यवंदनेचे दिग्दर्शन संगीत विभागाच्या साधिका सौ. सावित्री इचलकरंजीकर यांनी केले. या भक्तिमय नृत्यात कु. वैष्णवी गुरव, कु. बांधव्या श्रेष्ठी, कु. सोनाक्षी चोपदार, कु. चांदणी आसोलकर, कु. शर्वरी कानसकर, कु. आराधना घाटकर, कु. अपाला औंधकर, कु. निधी गवारे, कु. तीर्था देवघरे, कु. अंजली कानसकर, कु. मृणालिनी देवघरे, कु. मोक्षदा देशपांडे आणि कु. वैदेही सावंत यांनी सहभाग घेतला. नृत्य सादर करताना साधिकांनी गुरूचरणी कृतज्ञता व्यक्त केली. संगीत विभागातील साधिकांनीही आपली भक्तिभावपूर्ण संगीतसेवा सादर करून गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त केली. महर्षि अध्यात्म विश्वविद्यालय ‘कलेचा उपयोग ईश्वरप्राप्तीसाठी’ या सिद्धांतावर कार्यरत असून साधिकांना नृत्य, गायन यांसारख्या माध्यमांतून आध्यात्मिक प्रगतीची दिशा दाखवत आहे.

# धमकीबाज, सत्तालोभी मुख्यमंत्री

जिथे निवडणुका जिंकाल, तिथे भरघोस निधी तुम्हाला विकासासाठी देऊ अशी जाहीररीत्या धमकी देवेंद्र फडणवीस यांनी दिली ते युपी बिहार चे मुख्यमंत्री आहेत कि महाराष्ट्राचे ? हा संविधानाचा अपमान नाही काय ? सत्तेवर जनताच बसवते आणि जनतेलाच डोळे वटारून धमकी देणे हे असले प्रकार भाजपच्या नेत्यांमध्ये गेल्या दहा वर्षात कमालीचे वाढले आहे. लोकशाही खतरेमे म्हणणाऱ्या विरोधी पक्षातही काही दम नाही. १५० जागा निवडून आल्यासच निधी दिला जाईल हि धमकी हे कोणत्या संविधानात,कायद्यात बसते. अशी धमकी देणाऱ्याला कायद्याचे संरक्षण आहे काय ? मुख्यमंत्री फडणवीस हे उच्च कुळातले सुशिक्षित,कायद्याचे गाढे अभ्यासक असून विरोधकांना कोणत्याही विषयात गारद करण्याचे कुटील कौशल्य असलेल्या फडणवीसांनी जी धमकी दिली त्याची गांभीर्याने दखल घेतली गेली पाहिजे.कारण म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावता कामा नये.जर जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणार असाल तर खंडणीची धमकी देणारा,ठार मारण्याची धमकी देणारा,फेरीवाला हफ्ते गोळा करणारा,धमकी देऊन पक्ष वर्गणी मागणारा, हात पाय तोडीन म्हणणारा,महिलावर लैंगिक अत्याचार अथवा पैशाची मागणी करणारा ब्लॅकमेलर,अपहरण करून खंडणीची करणारा,पोलिसांना धमकावणारा,अश्या अनेक धमकी अथवा ब्लॅकमेलिंगच्या प्रकाराकडे कायदेमंडळ दुर्लक्ष करणार आहेत काय ? जर नसेल तर ज्या कर भरणाऱ्या जनतेच्या जीवावर लोकप्रतिनिधींची बिनव्याजी पोटे भरतात,ते भरपगारी विश्वस्त आहेत. जनतेचे मालक नाहीत.संविधानाच्या कायद्याने सरकारी सुविधांवर देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री असून अशी धमकीची भाषा करून मतदार जनतेला ब्लॅकमेलिंग करत असतील तर पोलीस प्रशासनाने इतर गुन्ह्या प्रमाणे कायदेशीर शिक्षा केली पाहिजे.न्यायालयाने ह्यात तातडीने लक्ष घालून अश्या धमकीबाजांना कायद्याने योग्य ती शिक्षा द्यावी.अन्यथा अन्य प्रकारच्या गुन्हेगारांना अटक केली असेल तर ताबतोब त्यांची सुटका करावी व भविष्यात ब्लॅकमेलचा प्रकार घडला तर त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करू नये.राज्यात अराजकता ,माजवणारा मुख्यमंत्री असेल तर इतरांनाही त्याचा फायदा मिळाला पाहिजे. मुख्यमंत्र्यांनी कोणत्याही एखाद्या व्यक्तीला ठार मारले तर पोलीस कायद्याप्रमाणे वागणार कि ते मुख्यमंत्री आहेत म्हणून सोडून देणार कि अटक करणार ? मुख्यमंत्री यांच्यावर कारवाई होणार नसेल व त्यांनी धमकी देऊन सत्ता आणली त्याबद्दल त्यांचा निवडणूक आयोग,पोलीस खाते न्यायालय ह्यांनी त्यांचा जाहीर सत्कार करावा.महाराष्ट्र हे संविधानाचे पालन करणारे सुसंकृत राज्य आहे. त्याच्या अस्तित्वावर कोणी घाला घालत असेल तर अश्या सत्तेचा माज चढलेल्या व्यक्तींना न्यायालयाने, पोलीस यंत्रणेने, जनतेने तेथल्या तेथेच ठेचून काढले पाहिजे.



**यशवंत चव्हाण, सीबीडी, बेलापूर.**

# निवडणूक आयोगाकडून वकील व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**मुंबई** - नवी दिल्ली येथील खखखऊएच् मध्ये भारताच्या निवडणूक आयोगाच्या वतीने आयोजित वकिलांच्या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या वेळी निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी हे देखील उपस्थित होते. या परिषदेत भारताच्या सर्वोच्च न्यायालयातील आणि देशभरातील २८ उच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ तसेच सर्व ३६ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य निवडणूक अधिकारी (उएजी) आणि निवडणूक आयोगाचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले.

या उपक्रमाचा उद्देश आयोगाच्या कायदेशीर चौकटीला उदयोन्मुख आव्हानांचा सामना करण्यासाठी अधिक प्रभावीपणे पुन्हा आकार देणे आणि समन्वय साधणे हा आहे. परिषदेच्या माध्यमातून अनावश्यक वाद टाळण्यावर आणि सर्व संबंधित पक्षांना योग्य त्या सुनावणीची संधी देण्यावर भर देण्यात आला.

दिवसभर चाललेल्या या परिषदेने देशभरातील प्रख्यात कायदा तज्ज्ञ आणि आयोगातील प्रतिनिधी यांच्यात संवाद साधण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. ही परिषद भारतातील निवडणूक संबंधित न्यायप्रणालीच्या बदलत्या स्वरूपाशी आयोगाच्या कायदेशीर संसाधनांना जुळवून घेण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरली. यामध्ये निवडणूक कायदे, न्यायालयीन प्रक्रिया आणि कायद्यातील सुधारणांशी संबंधित मुद्द्यांवर विशेष भर देऊन आयोगाच्या कायदेशीर संघटनेची कार्यक्षमता, तयारी आणि समन्वय वाढवण्यावर चर्चा झाली. या संवादाद्वारे विविध न्यायालयीन स्तरांवरील आयोगाच्या प्रतिनिधित्वाची प्रभावीता वाढवण्याचा उद्देश होता.

# रोजगार हमी योजना अधिक प्रभावीपणे राबवा - रोहयो मंत्री भरत गोगावले

**सिंधुदुर्गनगरी** - रोजगार हमी योजना ही ग्रामीण विकासासाठी एक महत्त्वाची योजना आहे. ग्रामीण भागात ‘रोजगार हमी’ मुळे बदल होत आहेत. या बदलाची गती वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेऊन नियोजन करावे. तसेच योजनेचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश रोजगार हमी, फलोत्पादन आणि खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न झाली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार दीपक केसरकर, जिल्हाधिकारी अनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. माणिक दिवे, रोजगार हमी योजनेचे उपजिल्हाधिकारी नितीन राऊत तसेच संबंधित विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते. श्री गोगावले पुढे म्हणाले की, रोजगार हमी योजना विभागामार्फत जिल्ह्यात कामांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. फलोत्पादन विभागांच्या योजनांचा प्रसार आणि प्रचार करुन योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचवणे आवश्यक आहे. गट विकास अधिकाऱ्यांना दिलेले उद्दिष्ट्य पूर्ण करावे. बांबु लागवडीमधून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळत असल्याने बांबू लागवडीला देखील प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

## वाचकांचे मनोगत

# आणखी किती हुंडाबळी ?

एकविसाव्या शतकातही वैष्णवी हगवणे, वय २३ वर्ष, सासरे -राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी अशा घरात वैष्णवीची आत्महत्या ? ज्या महाराष्ट्रात स्त्रीवाद, स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रीमुक्ती, स्त्री- पुरुष समानता अशा घोषणा नेहमीच ऐकू येतात अशा ठिकाणी राजकारणाशी डायरेक्ट संबंध असणाऱ्या घराण्यात २३ वर्षाच्या वैष्णवीला आत्महत्या करावी लागले हे अतिशय लज्जास्पद आहे. आणखी किती प्रकरणे घडल्यानंतर आपण जागे होणार ? सध्याच्या अतीश्रीमंत लोकांच्या परिवारात हौसेचा भाग म्हणून हुंड्याला भेट वस्तूचे स्वरूप लाभले. आधुनिक शिक्षण घेतलेली अनेक कुटुंबे आजही या भेटवस्तूंच्या नावाखाली लग्नकार्यात लाखो रुपयांच्या भेटवस्तू देताना दिसतात. हे मनाप्रमाणे न मिळाल्यामुळे मुलींवर जो दबाव पडतो त्यातून अशी आत्महत्येचे प्रकरण घडते. अशी प्रकरणेआपल्याला विचार करण्यासाठी भाग पाडतात. ’यत्र नार्यस्तु पुज्यते, रमन्ते त्र देवता’ ही आपली हिंदू धर्माची शिकवण ! भारतातील स्त्रीला मिळणारा मान आणि सन्मान आज एकविसाव्या शतकात हरवून गेला आहे. केवळ कायदे करणे नव्हे तर समाजाच्या मानसिकतेत पालट घडवून आणण्याने खऱ्या अर्थाने स्त्री सन्मानाची परंपरा जपली जाऊ शकते. आजच्या भारतात स्त्रियांनी अनेक क्षेत्रांमध्ये जी प्रगती केली आहे ती खऱ्या अर्थाने सार्थ होईल. प्राचीन हिंदू संस्कृतीमध्ये स्त्रियांना जो सन्मान होता तोच आधुनिक भारतात मुलींना मिळायला हवा. खरे तर आम्हा सर्वांचे हे एक सामाजिक उत्तरदायित्व आहे. त्यामुळे मुलींना व समाजातील प्रत्येक स्त्रीला घरगुती अत्याचाराला सामोरे जाणे थांबवायचे असेल तर आपण सर्वांनी मिळून हिंदू धर्माची शिकवण आचरणात आणण्यासाठी प्रयत्न करूया ! -

**प्रा. रोहिणी जोशी, संभाजीनगर**

## पान १ वरुन

### मराठा, धनगर ...

सुदैवाने या संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी यांच्या पाठीमागे गृहमंत्री असलेल्या श्री देवेंद्र फडणवीस यांचा हात नसेलच त्यांची फुस नसेल आणि नाही तर, साक्षात शिवछत्रपती राज्याभिषेक सोहळा कायमस्वरूपी नामशेष करावा.! असे जाहीर सामाजिक धार्मिक स्फोटक व्यक्तव्य करणारा संभाजी भिडे ऊर्फ मनोहर कुलकर्णी आणि हा वाद वाढवणारा आणि राज्यातील शिवप्रेमीच्या भावनेशी खेळणारे गुणरत्न सदावर्ते आदीवर राज्यसरकारने व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः होऊन कठोरात कठोर गुन्हे दाखल करण्याचे आदेश तातडीने देऊन तसे गुन्हे दाखल करावेत आणि आपण सराईत शिवद्रोह्यांच्या बाजूने नाही हे कृतीतून सिद्ध करावे असेही आवाहन डॉ. संजय लाखेपाटील यांनी केले आहे.

येत्या ३१ मे रोजीच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्म जयंती कार्यक्रमाला गालबोट लागावे आणि त्यातून मराठा धनगर बहुजन हा वाद वाढावा या अतिशय कुटील खेळतील ही एक देवेंद्र फडणवीस प्रणीत चाल आहे. हे ओळखून समस्त बहुजन समाजाने सावध राहावे असे आवाहन ही डॉ. संजय लाखेपाटील यांनी केले आहे.

### महिलांसाठी होम ...

मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, गटविकास अधिकारी संदीप पवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांची उपस्थिती राहणार आहे.

उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने संस्थेच्या ५ व्या वर्धापण दिनानिमित्त हिरकणी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान महिला सक्षमीकरण अभियान अंतर्गत संस्थेच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या हिरकणी सुरक्षा अभियानाची सुरुवात देखील हिरकणी महोत्सवात होणार आहे. हिरकणी सुरक्षा अभियान अंतर्गत १९ ते ३५ वयोगटातील मुली आणि महिलांची मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षण आणि स्वसंरक्षण प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येणार आहे. दरम्यान महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर ठेवण्यात आले आहे. महिला आणि बालकांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती देणारे स्टॉल आणि अर्ज कार्यक्रमाच्या स्थळी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

महिलांच्या आवडीचा आणि पसंतीचा होम मिनिस्टर कार्यक्रम देखील आयोजित केला असून त्यात महिलांना पैठणी, चांदीचं नाणं, रोख रक्कम जिंकता येणार आहे. यावेळी राज्यभरातील विविध क्षेत्रात काम करणार्या कर्तबगार महिलांचा हिरकणी पुरस्काराने गुणगौरव होणार आहे. कार्यक्रमासाठी आलेल्या पहिल्या २०० महिलामधून ३ भाग्यवान विजेत्या महिलांना पैठणी मिळणार आहे.

झी- टॉकीज, झी-मराठी, कलर्स मराठी, सोनी मराठी अशा विविध वाहीन्यावर प्रसिध्द असलेले शाहीर रामानंद उगले यांचा महिलांसाठीचा भव्य सांस्कृतीक कार्यक्रम देखील होणार आहे. यामध्ये भारुड, गवळण, पोवाडा, लोकगीताचे सादरीकरण होणार असून सिंगापूर रिर्टन लावणी सम्राज्ञी स्नेहा दुधाळ यांचा परफॉर्मंस देखील होणार आहे.

**जगातील पहिल्या सर्प मैत्रिणीची उपस्थिती**

राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त तसेच जगातील पहिल्या सर्प मैत्रीण आणि सर्प रक्षक असलेल्या वनिता बोराडे यांचीही या कार्यक्रमाला उपस्थिती राहणार असून त्यांच्या माध्यमातून महिलांना मार्गदर्शन होणार आहे.

## सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत थायरॉईड निदान अभियान

# वर्षभर चालणाऱ्या अभियानात १० हजार चाचण्यांचे उद्दिष्ट-डॉ. राजेश सेठीया

**जालना । प्रतिनिधी -** सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत थायराइड निदान अभियान राबविण्यात येणार असून, प्रकल्प प्रमुख रुबी हॉस्पिटलचे संचालक डॉ. राजेश सेठीया यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभरात १० हजार थायरॉईड चाचण्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडिया यांनी दिली.

२५ मे हा जागतिक थायरॉईड दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून या अभियानाची रूपरेषा विषद करताना श्री. बगडिया म्हणाले की, १ जुलै २०२५ डॉक्टर डे पासून ३० जून २०२६ असे वर्षभर थायरॉईड निदान अभियान राबविले जाणार असून, या अभियानासाठी रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या नूतन अध्यक्ष डॉ. प्रतिभा श्रीपत, सचिव पंकज लड्ढा, इंद्रायणी पॅथॉलॉजीचे डॉ. जितेंद्र बारगाजे, डॉ. संदीप कुलकर्णी यांचे सहकार्य लाभणार आहे. या आजाराचे वेळीच निदान होणे गरजेचे आहे; अन्यथा अनेक संभाव्य धोके असतात. शासन आणि विविध सेवाभावी संस्था अनेक आजाराबाबत निदान मोहीम, अभियान राबवितात. मात्र, थायरॉईड निदान दुर्लक्षित आहे. सर्वसामान्य जनता अद्यापही थायरॉईडबाबत अनभिज्ञ आहे. विशेष करून या चाचण्या महागड्या असल्याने, सर्वसामान्य जनता स्वतःहून निदान करण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. वेळेवर निदान होऊन उपचाराने पुढील संभाव्य गुंतागुंतीचे आजार टाळण्याच्या उद्देशाने आम्ही विशेष अभियान राबवणार आहोत. यापूर्वी रोटरी इंटरनॅशनलचे डायबिटीज डायरेक्टर डॉ. राजेश सेठिया यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण प्रांतात राबविण्यात आलेल्या अब की बार एक लाख पार या मोफत मधुमेह निदान अभियानाची यशस्विता पाहता, प्रकल्प प्रमुख डॉ. सेठीया यांच्या संकल्पनेतून वर्षभर मोफत



थायरॉईड निदान अभियान राबविण्याचा निर्णय ट्रस्टने घेतल्याची माहिती पन्नालाल बगडिया यांनी दिली. या अभियानासाठी ग्रामीण आणि शहरी भागात जिल्हाभर जनजागृती केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या अभियानाचे प्रकल्प प्रमुख डॉ. सेठीया म्हणाले की, सामाजिक दायित्वातून सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बागडिया यांचे शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक उपक्रमासाठी नेहमीच योगदान लाभत आलेले आहे. रोटरीच्या प्रांत स्तरावरील अब की बार एक लाख पार या मोफत मधुमेह निदान अभियानात ३० हजार मधुमेह तपासणी किट्सचे योगदान सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया ट्रस्टचे राहिलेले आहे. आता ट्रस्टमार्फत राबविले जाणारे मोफत थायरॉईड निदान अभियान अत्यंत स्तुत्य ठरणार असून, असे सांगून ते म्हणाले की, थायरॉईड ग्रंथीच्या कार्यातील बिघाडामुळे वजन वाढणे किंवा घटणे, थकवा, केस गळणे, मासिक पाळीतील बदल, त्वचा कोरडी किंवा जाड होणे, मानसिक अस्वस्थता, वंध्यत्व, हृदयविकार, हाडांचे आजार अशी अनेक लक्षणे दिसून येतात. वेळीच निदान न झाल्यास थायरॉईड विकार गुंतागुंतीचे स्वरूप धारण करतो. विशेषतः महिलांमध्ये त्याचे प्रमाण जास्त असून, गरोदरपणात आई व बाळ दोघांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. आयोडीनची कमतरता, औषधांचे दुष्परिणाम, व्यायामाचा अभाव आणि आधुनिक जीवनशैली ही यामागील प्रमुख कारणे आहेत. थायरॉईड आजाराचे वेळीच निदान झाले नाही तर भविष्यात होणाऱ्या गुंतागुंती टाळणे कठीण होते. त्यामुळे मोफत चाचण्या उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. जर तुम्हाला ही लक्षणे दिसत असतील तर या अभियानात मोफत थायरॉईड तपासणी करून घ्यावी, असे आवाहन डॉ. सेठिया यांनी केले आहे.

थायरॉईड विकाराचा सर्वाधिक फटका महिलांना बसतो. सध्याच्या आकडेवारीनुसार भारतात थायरॉईडचे प्रमाण महिलांमध्ये ८९ टक्के असून पुरुषांमध्ये केवळ ११ टक्के आहे. शासकीय आकडेवारीनुसार भारतात ४ कोटी २० लाख थायरॉईडचे रुग्ण आहेत. प्रत्यक्षात या आजाराबाबत अनभिज्ञ असलेले व निदान न केलेले असे १० ते १५ कोटी लोक आहेत. त्यांचा शोध घेणे म्हणजेच निदान होणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने देश पातळीवर शासन स्तरावरून विशेष मोहीम राबवली जाणे गरजेचे आहे. विशेषतः महिलांमध्ये वंध्यत्वासारख्या गंभीर समस्या ह्या थायरॉईड ग्रंथीच्या असंतुलनामुळेच उद्भवतात. या विकारामागे आयोडीनची कमतरता हे मुख्य कारण आहे. अद्यापही अनेक कुटुंबांमध्ये खडे मीठ वापरले जाते, ज्यामध्ये आयोडीनचे प्रमाण अत्यंत कमी असते. त्यामुळे खडे मीठ टाळून आयोडीनयुक्त मीठाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. शिवाय आधुनिक जीवनशैलीतील व्यायामाचा अभाव, फास्ट फूडचे अतिसेवन आणि असंतुलित आहार हे देखील थायरॉईड वाढण्याची प्रमुख कारणे आहेत. त्यामुळे शरीरातील बदलांबाबत सजग राहणे, वेळेवर निदान करून घेणे आणि निरोगी जीवनशैली अंगीकारणे आवश्यक असल्याचे अभियान प्रकल्प प्रमुख डॉ. राजेश सेठीया यांनी म्हटले आहे.



थायरॉईड चाचण्या सामान्यांसाठी खर्चिक असतात, म्हणून त्याकडे दुर्लक्ष होते. या पार्श्वभूमीवर, गरजू आणि अनभिज्ञ लोकांसाठी हे अभियान जीवनदायिनी ठरणार आहे. समाजासाठी काहीतरी चांगले करावे, याच भावनेतून आम्ही हा उपक्रम सुरू करत आहोत. आरोग्य, शिक्षण आणि समाजसेवा यामध्ये सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचा सहभाग यापुढेही असाच सुरू राहील.

**पन्नालाल बगडिया**
**अध्यक्ष, सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्ट**

---

# पावसाळ्यापुर्वी स्वच्छता करा

## परतूर नगरपरिषद मुख्याधिकारी यांना निवेदन



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहरातील पाऊसाचे पाणी व्यवस्थापन व स्वच्छते बाबत निवेदन मा. मुख्याधिकारी यांना देण्यात आले आहे. जुन महिना सुरू होण्यापूर्वी पावसाने हजेरी लावल्याने परतूर शहरातील पाऊसाचे पाणी शहरातील मेन रोड, मार्केट मध्ये काही दुकाना मध्ये शिरल्याने घान पाण्याचा यांना त्रास सहन करावा लागला आहे.यामुळे व्यवस्थापन व स्वच्छता राखण्यासाठी परतूर शहरातील परतूर नगर परिषदेने कोणतेही पाऊल अदयापही उचलेले नाही म्हणून शहरातील नाली वाहनारे ओढे त्यातील असणारा कचरा जाग्यावर जम लेला असुन नाली व ओढे मधील घाण ही वाहतुकीच्या रस्त्यावर येत असुन शहरातील कामासाठी येजा करण्यासाठी व शहरातील रहिवाशी असणाऱ्या बांधव भगीनी यांना यांच्या घरासमोर दुषीत पाण्याचा सामना करावा लागत आहे.

अवकाळी पाऊसामुळे शहरात जमा झालेला कचरा व गाळामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे व येणाऱ्या जुन मान्सुन पुर्वी नगर परिषद प्रशासनाने या विषयी गांर्भीयपुर्वक दखल घेवून तात्काळ कार्यवाही करावी.व परतूर शहरातील नागरीकांना होणाऱ्या त्रासा पासून सुटका करावी.या वेळी,

सावता काळे, ॲड. सुरेश काळे, अर्जुन जगताप,अजित पोरवाल, आनंद कोटेचा,नरेश कांबळे, पुनमचंद फूलमाळी, कुणाल बन्सिले, सौरभ नरवैये, अविनाश राऊत,अविनाश खरात, सोमनाथ हजारे, गौतम कोटेचा, आकाश काबरे, रवी मुंददा, डॉ शीतल लाहोटी, सचिन काटे, नारायण मुंददा, अनिरुद्ध कातारे, अमोल अग्रवाल, बाळू सोळंके, रवी दायमा, बालाप्रसाद जेथलिया, डॉ दिपक कंदोई, जयवंत हतवनकर, दुर्गेश पोद्दार, अनिल अग्रवाल, योगेश खंडेलवाल, अभिजीत जोशी, प्रशांत डोम.या निवेनावर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

---

# क्यूआर कोड स्कॅन करा अन् ऑनलाईन नक्कल मिळवा

## घनसावंगी उपअधीक्षक कार्यालयाचा उपक्रम, शेतकऱ्यांसह नागरिकांना होणार फायदा

**घनसावंगी । प्रतिनिधी -** शंभर दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम अंतर्गत जिल्ह्यातील उपअधीक्षक भूमी अभिलेख घनसावंगी येथे कार्यरत उपअधीक्षक शालिनी बिदरकर यांनी मोजणीवरील तक्रारी अर्ज व नक्कल अर्ज मिळवण्यासाठी स्वत: क्यूआर कोड तयार केला आहे. हा क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर घरबसल्या मोजणीशी संबंधित काही तक्रार असेल तर ती ऑनलाईन करता येते. याबरोबरच प्रॉपर्टीशी संबंधित नक्कल मिळवायची झाल्यास तीदेखील क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर घरबसल्या ऑनलाईन प्राप्त करता येते.

उपअधीक्षक भूमी अभिलेख घनसावंगी कार्यालयात रूजू झाल्यापासून उपअधीक्षक शालिनी बिदरकर यांनी कर्मचाऱ्यांना शिस्त लावण्याबरोबरच तालुक्यातील शेतकरी व नागरिकांचे मोजणीचे अर्ज वेळेत निकाली काढणे, कार्यालयात स्वच्छता राखण्याच्या अनुषंगाने गेल्या अनेक वर्षांपासून वापरात नसलेल्या फर्निचरची दुरूस्ती करून घेतली. याबरोबरच कार्यालयात इंटरनेटचे कनेक्शन घेणे आदी कामे करून कार्यालयाचे रूपडे पालटले आहे.

आता कार्यालयात खेटे मारण्याची गरज नाही..

यापूर्वी प्लॉट किंवा शेतजमीन मोजल्यानंतर त्यात काही त्रुटी असल्यास तक्रार करण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालयात खेटे मारावे लागत होते. मात्र, आता मोबाईलवरून क्यूआर कोड स्कॅन केला की घरबसल्या लगेच मोबाईलवर तक्रार अर्ज ओपन होतो, त्यावर तक्रारदाराचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, ज्या गटाची तक्रार करावयाची आहे, त्या गटाचे नाव, ज्या गटाच्या मोजणीची तक्रार करायची आहे, त्याचा गट क्रमांक, तक्रारीचे स्वरूप आदी माहिती भरून हा फॉर्म सबमीट केला की, घरबसल्या तक्रार करता येते.

**मोबाईलवरच मिळेल सुविधा**

जमीनीशी संबंधित नक्कल मागणी अर्जही यापूर्वी कार्यालयात जाऊन भरून द्यावा लागत असे. आता क्यूआर कोड स्कॅन केला की, लगेच मोबाईलवरच अर्ज ओपन होतो, त्यात अर्जदाराचे नाव, मोबाईल क्रमांक, नक्कल मागणी केलेल्या गावाचे नाव, गट नंबर आदी माहिती भरून अर्ज सबमीट केला की, तो संबंधित विभागाच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडे जातो व त्यानंतर नक्कलही ऑनलाईन म्हणजे मोबाईलवर किंवा ईमेलवर प्राप्त करून घेता येते.



**गावातच उपलब्ध होणार सुविधा**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सोयीसाठी क्यूआर कोड तयार केला आहे. याचा उद्देश हा आहे की, आता संबंधित शेतकरी किंवा ज्यांनी मोजणी केलेली आहे, त्यांना कार्यालयात येण्याची गरज नाही. क्यूआर कोड स्कॅन केला की संबंधितांना नक्कल मागणी अर्ज, तक्रार किंवा मोजणी करण्याची प्रक्रिया ही सुटसुटीत व सहज होणार आहे. हे क्यूआर कोड आता नगरपंचायत व तालुक्यातील ग्रामपंचायतमध्ये लावण्यात येणार आहेत. ज्यामुळे गावातच शेतकऱ्यांना मोजणीशी संबंधित सुविधा उपलब्ध होईल, असे घनसावंगी भूमी अभिलेख उप अधिक्षक शालिनी बिदरकर यांनी सांगितले आहे.

---

# जालन्यात कौटूंबिक वादाच्या चालू वर्षात २२ तक्रारी, भरोसा सेलची माहिती




**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात चालू वर्षात कौटुंबिक तसेच पती-पत्नीतील वादाची २२ प्रकरणं समोर आलीयत.दारू पिऊन पत्नीला त्रास देणं,मारहाण करणं , अफेअर असणं ,पत्नीच्या माहेरकडून पैशाची मागणी होत असल्याच या प्रकरणातून समोर आलंय.जालन्यातील भरोसा सेलनं ही माहिती दिलीय.२०२५ मध्ये भरोसा सेलकडे पती-पत्नी वादाच्या २२ तक्रारी दाखल झाल्या असून या पैकी ९ तक्रारी निकाली काढण्यात आल्यायत. तर १३ तक्रारी तडजोडीसाठी ठेवण्यात आल्यायत.भरोसा सेलकडे आलेल्या २२ पैकी ६ प्रकरणावर तडजोड होत नसल्यानं कायदेशीर कारवाईसाठी पोलिसांना ६ पत्र देण्यात आलेत.२०२४ मध्ये भरोसा सेलकडे १३८ जोडप्यांच्या तक्रारी आल्या होत्या.यापैकी १३६ तक्रारी भरोसा सेलनं निकाली काढल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक उमा घोरपडे यांनी दिलीय.

# तळणी येथील अखंड हरिनाम सप्ताहास आ. बबनराव लोणीकर यांची सदिच्छा भेट




**मंठा । प्रतिनिधी -** तळणी तालुका मंठा येथे श्री संत नेमिनाथ महाराज संस्थान येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह निमित्त हभप सुधाकर महाराज मुळे शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनप्रसंगी उपस्थित राहून माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी सप्ताह सदिच्छा भेट दिली. यावेळी आवर्जून २००३ मध्ये आपण नेमिनाथ महाराज मंदिरासाठी सभागृह दिल्या असून यापुढे देखील संस्थांच्या मागणीप्रमाणे आगामी काळात निधीची उपलब्धता झाल्यानंतर दिले जाईल असा शब्द आ. बबनराव लोणीकर यांनी दिला.

यावेळी हभप अर्जुन महाराज बादाड, हभप जनार्दन स्वामी महाराज सरकटे हभप भगवान महाराज सरकटे हभप विष्णु महाराज बादाड संस्थान चे अध्यक्ष गोवर्धनसिंग चव्हाण, शिवाजीराव सरकटे श्रीराम भावसार विनायक राठोड दारासिंग चव्हाण लक्ष्मण खरात दत्ता सरकटे हरिभाऊ भुसारे सुभाष लाड विलास शीलवंत दिलीप सरकटे नितीन सरकटे गणेशराव कापकर भगवान महाराज सरकटे रवी पाटील यांच्यासह शेकडो वारकऱ्यांची उपस्थिती होती.

---

## मंठा येथे राज्यस्तरीय शिवसेना ओबीसी- व्हीजेएनटी संवाद दौरा

# तालुकाप्रमुख बोराडे यांच्या नेतृत्वात संघटना वाढीसाठी उत्कृष्ट काम - प्रदेशाध्यक्ष किसवे




**मंठा । प्रतिनिधी -** शिवसेनेचे महाराष्ट्र राज्याचे ओबीसी- व्हीजेएनटी सेलचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंठा येथील शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या कार्यालयात संवाद मेळाव्याचे आयोजन शनिवार (दि.२४) रोजी करण्यात आले.पक्षप्रमुख एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना धनगर, भटके विमुक्त, ओबिसी, बारा बलुतेदार या समाजाच्या वेगवेगळ्या जातींच्या कल्याणकारी योजना, महामंडळे व कल्याणकारी शासननिर्णय त्यांच्याद्वारे घेण्यात आली.या विकासाच्या व कल्याणकारी योजनांचा प्रसार करणे हे संवाद दौऱ्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. तसेच ओबीसी समाजाचे मायक्रो प्लॅनींग करुन त्यांच्या समस्या सोडविण्याचे काम येत्या काळात आम्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाने अधिक जलद गतीने करणार आहोत. ओबीसी प्रवर्गात काही मुख्य जाती वगळल्यास इतर छोट्या छोट्या जातींमधील लोकांच्या अनेक समस्या आहेत आणि त्या जाती मुख्य प्रवाहापासून दुर्लक्षित आहे म्हणून यासर्व वंचित समाजाशी संवाद साधण्यासाठी व त्यांच्या समस्या जाणुन घेण्यासाठी ह्या ओबीसी - व्हीजेएनटी संवाद दौऱ्याचे ३३ दिवस ३३ जिल्ह्यात अयोजन करण्यात आले आहे. या सर्व मायक्रो जातीतील जनतेला शिवसेनेशी घट्ट जुळवन्याचे काम आम्ही या माध्यमातून करत आहोत असे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांनी यावेळी सांगितले. यावेळी शिवसेना तालुका प्रमुख उदयसिंह बोराडे, सोलापुर जिल्हा प्रमुख सुयश करचे,सातारा जिल्हाप्रमुख हेमंत भोईटे,पुणे जिल्हाप्रमुख योगेश धरम, महिला उप जिल्हा प्रमुख कासाबाई शिरगुले, महिला तालुका प्रमुख सुनीता देशमुख,सविता गवली, उप तालुका प्रमुख रामराव वरकड, बालासाहेब देशमुख,पांडुरंग बोराडे,भिमराव वाघ, ऑड राजेश खरात, भगवान गायकवाड, सतिष वायाळ,स्वप्निल गडदै, चादं पठान, महेश विधाते, नंदु जाधव, विनोद खरात, भगवान बोराडे,माऊली वायाळ,

---

# मुंबई महानगरातील नालेसफाई ७ जूनपर्यंत पूर्ण करावी - एकनाथ शिंदे

**मुंबई -** मुंबई शहर आणि उपनगरात सुरू असलेली नालेसफाईची सर्व कामे ७ जूनपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महापालिका प्रशासनाला दिले. वेळेत काम पूर्ण न करणाऱ्या, नालेसफाईच्या कामात हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असे सांगत नाल्यातून काढलेला गाळ ४८ तासांच्या आत उचलला जावा असेही निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नालेसफाईच्या कामाची पाहणी केली. भांडुप येथील उषानगर, उषा कॉम्प्लेक्स, नेहरूनगर नाला वडाळा, दादर येथील धारावी टी जंक्शन जवळील नालेसफाईची पाहणी त्यांनी केली. यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना, मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर, माजी खासदार राहुल शेवाळे, आमदार तुकाराम काते, माजी आमदार सदा सरवणकर, महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. मुंबई महानगरात आतापर्यंत झालेल्या कामांची माहिती यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, पाऊस वेळेआधीच सुरू झाला असला तरीही नालेसफाई वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. आतापर्यंत मोठ्या नाल्याची ८५ टक्के तर छोट्या नाल्यांची ६५ टक्केपर्यंत सफाई पूर्ण झाली असून अजूनही १५ दिवस हातात आहेत. त्यामुळे हे काम वेळेत पूर्ण होईल असा विश्वास उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

# कै.एकनाथराव पा. घुगे यांच्या स्मरणार्थ आज हरीकीर्तन

## गुणवंत विद्यार्थी व माजी सैनिकांचा सत्कार!

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना नेते,माजी सरपंच, प्रगतशील शेतकरी तथा शासकीय गुत्तेदार कै. एकनाथराव पा. घुगे यांच्या पुण्यतिथी निमित्त रविवारी ( ता.२५) भराडखेडा ता. बदनापूर येथील नाथ कृषी फार्म वर हरीकीर्तन, गुणवंत विद्यार्थी व माजी सैनिकांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी दिली.


कै.एकनाथराव अंबुजी पा.घुगे (आण्णा)

सकाळी १०.00 ते १२.00 या वेळेत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध प्रबोधनकार , ह. भ .प. विलास महाराज गेजगे ( बीड) यांचे हरिकीर्तन होईल. तद्नंतर विधिमंडळ अंदाज समितीचे अध्यक्ष आ.अर्जुनराव खोतकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच आ. नारायण कुचे यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थी आणि माजी सैनिकांचा सत्कार सोहळा होणार आहे. यावेळी पंडितराव भुतेकर,अभिमन्यू खोतकर, ए.जे.बोराडे, विष्णू पाचफुले ,फेरोजलाला तांबोळी ,सुनील किनगावकर, आत्मानंद भक्त, कैलास मदन, कल्याणराव अवघड, भगवान मात्रे, संतोष मोहिते, भूषण शर्मा, भालचंद्र भोजने, राजेंद्र लाड ,गणेश सुपारकर, नानासाहेब वानखेडे , विशाल गाढे, दत्तात्रय बंगाळे, कैलास दुधानी, शिवाजी जऱ्हाड आदींची उपस्थिती राहणार असून पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, माजी जि.प .सदस्य भानुदासराव घुगे ,कार्यकारी अभियंता कृष्णा घुगे, माजी नगरसेवक गणेश घुगे, शाखा अभियंता अशोक घुगे, रमेश घुगे, तातेराव घुगे ,नारायण घुगे ,विलास घुगे, राधाकिसन घुगे ,हरिदास घुगे, कैलास पालवे, जगन्नाथ पालवे बाबासाहेब गीते, बाळाभाऊ गीते, मदन गीते, संतोष घुगे, किशोर घुगे, धर्मा घुगे , तेजांस घुगे, सुभाष बारगजे, दिलीप जायभाये ,राजीव वाघ ,सर्जेराव वाघ, संतोष ताठे ,सखाराम जावळे, विलास तुपे, रामेश्वर दराडे , समाधान दराडे ,संतोष मुळक आदींनी केले आहे.









हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.